# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

## प्रेसनोट

**CB/30/2026**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक ३०/०५/२०२६**

## '' वेश्या व्यवसायातुन ०२ पिडीत महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका ''

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.दीपक साकोरे, पोलीस सह आयुक्त, श्री.प्रमोद शेवाळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.पृथ्वीराज घोरपडे यांना दिनांक २९/०५/२०२६ रोजी त्याचे गुप्त बातमीदारामार्फत खात्रीलायक बातमी मिळाली की,''लगुन स्पा, अदिती अपार्टमेंट, ओनर्स असोसिऐशन, पी ४६३, एफ २, डी ५, तिसरा माळा, सेक्टर ०९, वाशी, नवी मुंबई येथील मॅनेजर इसम हा ग्राहकांना ७०००/- रूपये दर सांगुन कमी जास्त रक्कम घेवुन मसाजच्या नावाने तेथे असलेल्या महिलांकडुन जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेत आहे.''

वपोनि/घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास लगुन स्पा, अदिती अपार्टमेंट, ओनर्स असोसिऐशन, पी ४६३, एफ २, डी ५, तिसरा माळा, सेक्टर ०९, वाशी या ठिकाणी पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशा-यावरून दिनांक २९/०५/२०२६ रोजी पोलीस पथकासह छापा टाकला असता सदर ठिकाणी दोन पिडीत महिला मिळुन आल्या. नमुद स्पाची मॅनेजर मालक (१) महिला आरोपी सविता संतोष जैस्वाल, वय ४७ वर्षे, रा.रूम नं. १०३, सेक्टर ५, मातोश्री बिल्डींग, सानपाडा, नवी मुंबई. मुळ राहणार- उत्तर प्रदेश, (२) पुरूष आरोपी विनायक लहु कांबळे, वय ३० वर्षे, रा.रूम नं. १०, शिवशक्ती अपार्टमेंट, सेक्टर १८, नेरूळ. मुळ राहणार- जि.सातारा यांनी आपआपसात संगणमत करून ०२ पिडीत महिला यांना बॉडी मसाज करण्याचे नावाने प्राप्त करून नमुद रूम हा वेश्याव्यवसायाकरीता वापरून पिडितांचे कमाईवर स्वतःची उपजिवीका भागवित असताना मिळून आले. म्हणुन त्यांचे विरूध्द वाशी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर २३९/२०२६, भा.न्या.सं. कलम १४३ (२), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम १९५६ चे कलम ३, ४, ५ अन्वये दिनांक २९/०५/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात पुरूष व महिला आरोपी यांना अटक केली असुन त्यांची दिनांक ३०/०५/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे. गुन्हयाचा पुढील तपास वाशी पोलीस ठाणे करत आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी सहा.पोलीस आयुक्त, श्री.धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/ पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/योगेश देशमुख, पोउपनि/सरिता गुडे, पोशि/२६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण, पोशि/३४५२ कोलते, पोशि/४५४४ पाटील, पोहवा/२५०१ सविता म्हात्रे, पोहवा/२५०४ ज्योती अडकमोल, मपोहवा/२५०७ पावडे, मपोना/२९८४ भोये तसेच चालक पोहवा/मोहिते यांनी केली आहे.

★★★★★★★★★★


पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई
सहाय्यक पोलीस आयुक्त
व
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष
गुन्हे शाखा, नवी मुंबई